प्राथमिक शिक्षकांकरिता (इ.१ ली ते ८ वी) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आणि शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अआशा-२०१६/प्र.क्र.२६३/का-११

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
तारीख : २५ सप्टेंबर, २०१७.

वाचा :

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक : प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/ प्राशि-३, दि.१३ फेब्रुवारी, २०१३.

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक : अआशा-२०१३/प्र.क्र.२००/का.११ दि.३ ऑक्टोबर, २०१३.

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक : एसएसएन-२०१६/ (३०/२०१६)/ टीएनटी-२, दि.३० जून, २०१६.

प्रस्तावना :

केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची अंमलबजावणी राज्यात दि.१ एप्रिल, २०१० पासून सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाने दि.३१ मार्च, २०१० च्या अधिसूचनेद्वारे शिक्षक पदावर नियुक्तीसाठी पात्रता व सेवाशर्ती ठरविण्यासाठी कलम २३ नुसार राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एन.सी.टी.ई.) यांना शैक्षणिक प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद यांनी दि.२३ ऑगस्ट, २०१० व दि.२९ जुलै, २०११ च्या अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षकांकरीता (इयत्ता १ ली ते ८ वी) किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित केली असून शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य केली आहे. त्यानुषंगाने सदर अधिनियमातील तरतुदी प्राथमिक शिक्षकांसाठी (इयत्ता १ ली ते ८ वी करीता) लागू करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दि.१३.०२.२०१३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयाच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, केंद्रिय आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेशियल स्कूल यामधील शिक्षकांना शासन निर्णय दि.३ ऑक्टोबर, २०१३ अन्वये किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परिक्षा (TET) अनिवार्य करण्यात आली आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये शिक्षक पात्रता परीक्षेबाबत निर्देश देऊनही काही अनुदानित आश्रमशाळांमध्ये नियुक्त प्राथमिक शिक्षकांमध्ये शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण नसल्याचे दिसून आले आहे. तसेच सदर शासन निर्णयापूर्वी कार्यरत शिक्षकांनाही शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण करण्याबाबत निर्देशित करुनही त्याची अंमलबजावणीबाबत साशंकता आढळून येते. यास्तव प्रस्तुत शासन निर्णयान्वये शासन पुढीलप्रमाणे निर्देशित करीत आहे.

शासन निर्णय :

केंद्र शासनाने निर्देशित केल्यानुसार व शासन निर्णय दि.३ ऑक्टोबर, २०१३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, केंद्रिय आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेशियल स्कूल यामधील शिक्षकांच्या नियुक्ती समयी (इयत्ता १ ली ते ८ वी) किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता (TET) परीक्षा धारण करणाऱ्या उमेदवारांनाच नियुक्त करण्यात यावे. तसेच शासन निर्णय दि.३ ऑक्टोबर, २०१३ ते आजपर्यंत राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, केंद्रिय आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेशियल स्कूल या शाळांमध्ये नियुक्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांपैकी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण नसलेल्या उमेदवारांनी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) प्रथम ३ संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. आयोजित केलेल्या परीक्षा या संधी म्हणून गणल्या जातील. सदर परीक्षेस बसण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. शिक्षक पात्रता परीक्षा (TET) ३ संधीत उत्तीर्ण न झाल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात.

२. तसेच यापुढे राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, केंद्रिय आश्रमशाळा व एकलव्य रेसिडेशियल स्कूल या शाळांमध्ये प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्ती समयी (इयत्ता १ ली ते ८ वी) शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण उमेदवारांचीच निवड करण्यात यावी. शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद कंत्राटी स्वरुपात शैक्षणिक सत्र समाप्त होईपर्यंत भरण्यात यावे. अशाप्रकारे नियुक्त कंत्राटी शिक्षकास शासनाकडून कोणतेही आर्थिक अनुदान अथवा सेवाविषयक लाभ मिळणार नसून त्यांच्या सेवा आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन सत्रसमाप्तीपर्यंत कंत्राटी स्वरुपात भरण्यात यावे. परंतु शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण नसलेल्या उमेदवारास प्राथमिक शिक्षण सेवक पदावर नियुक्ती देण्यात येऊ नये. कंत्राटी नियुक्तीवरील वेतनाचा खर्च संबंधित संस्थेने स्वनिधीतून भागवावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२५१६४२२६६२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2017.09.25 16:31:18 +05'30'

(सु. ना. शिंदे)
उप सचिव

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

३) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
६) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
७) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
८) खाजगी सचिव, मा.मंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई.
९) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी (का-१३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कक्ष अधिकारी (का-१९), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती (कार्यासन-११)